(37)



Volume-2 (2021)
Issue-1 (January)

Volume-2 (2021)

# Research Hub

International Peer-Reviewd Multidisciplinary E-Journal

Research Hub

Issue-1 (January)

Skylark International Publication
38, Mitra Nagar
Manewada, Nagpur
www.researchhub.org.in

L. N.P.W. College, Lakhani Dt. Bhandara
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Volume-2 (2021)
Issue-1 (January-2021)

**RESEARCH HUB**

International Peer-Reviewed/Refereed Multi-Disciplinary E-Journal

# मानवी हक्क आणि महिला विकास

डॉ. उमेशकुमार पी. शहारे
स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय लाखनी
kanchanumesh358@gmail.com
९८५०२२७७६२

## प्रस्तावना

पृथ्वीतलावर मानवजातीचे अस्तित्व असल्यापासून स्त्री आणि पुरूष हे दोन परस्परपुरक घटक अस्तित्वात आहेत. जीवनसृष्टीच्या उत्क्रांतीत व प्रगतीत या दोन्ही घटकांची भूमिका बरोबरीची व मोसमी आहे. केवळ मानव जमातीतच नव्हे तर अगदी सामान्यात सामान्य असणारे पशू, पक्षी, किटक यांच्यात देखील नर आणि मादी हे दोन घटक व त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका आदिकाळापासून कार्यरत आहे. त्याचाच परिणाम म्हणजे आपण अप्रगत अवस्थेतून प्रगतीकडे वाटचाल करीत आहोत. दैनंदिन जीवनात जीवनावश्यक व जीवनोपयोगी असणाऱ्या कार्याचे वर्गीकरण त्या त्या काळच्या गरजेनुसार व स्थितीनुसार सहजपणे केले गेले आणि घरचे क्षेत्र स्त्रियांकडे व बाहेरचे पुरूषांकडे अशी कामाची वाटणी झाली. विकासाच्या प्रवाहासह बदलही अपेक्षित होते. हळूहळू समाजपरिवर्तन होऊ लागले आणि काळाच्या मागणीनुसार स्त्री घटक देखील कुटुंबासाठी पुरूषांबरोबर कामात सहभागी झाली आणि इथूनच श्रमविभाजनात पुरूषांना अधिक मजुरी तर स्त्रियांना कमी ही प्रथा रूढझाली. तिच्या मानसिक कार्यक्षमतेपेक्षा त्याकाळी शारीरिक कार्यक्षमतेचा विचार अधिक करण्यात आला आणि तिच्या आर्थिक शोषणाची सुरूवात झाली. जी आजतागायत अनेक क्षेत्रात सुरूच आहे. 'अधिक कष्ट आणि वेतन' या कथकथित नियमाप्रमाणे त्याला अधिक मजुरी वेतन तर तिला कमी वेतन. हे चित्र आजही आपल्यास आसपास बघायला मिळते. बांधकाम करणाऱ्या मजुरांचे उदाहरण याबाबतीत अधिक बोलके आहेत.

मानव या घटकाचा विचार करताना त्यात स्त्री, पुरूष असा भेद केलेला नाही. संविधानाने महिलांना बरोबरीचा दर्जा व हक्क बहाल केले आहे. त्या अनुषंगाने विकासाच्या टप्प्यात महिला हा घटक महत्त्वाचा ठरतो. हे सर्वमान्य करावेच लागेल. अर्थात महिलांचे न्याय हक्क व अधिकार त्यांना पूर्णपणे मिळत असतील तर महिला विकास संकल्पना प्रत्यक्षात साकार होताना दिसून येईल.

१८८५ साली बिजींग येथे जागतिक महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले व त्याचा पाठपुरावा करण्यासाठी १८८९ साली महिलांच्या प्रश्नाबाबत एक ठराव मंजुर करण्यात आला. यात एकूण ३८ बाबींचा समावेश करण्यात आला. ज्यामधील १४ वी बाब ''वुमन राइट अॅन्ड ह्युमन राइट'' असे घोषित करण्यात आले. देशाच्या शाश्वत विकासाठी महिलांचा शाश्वत विकास व सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि सर्वांगीण विकास होणे गरजेचे आहे. संविधान, कायदे व काही समाजसुधारक महिलांना जरी समान हक्क देत असले तरी प्रत्यक्षात वास्तविक जीवनात मात्र महिला हक्क व त्यांचा विकास याबाबतीत बराच मोठा पल्ला गाठायचा आहे. घटनात्मक तरतुदी कायदे, धोरण व योजनाद्वारे महिला विकासाचे अनेक प्रयत्न शासकीय पातळीवर देखील सुरू आहेत, पण त्याला १०० टक्के यश यायला अजून बराच काळ लागणार आहे. कारण भारतात कायद्यापेक्षा सामाजिक मानसिकता अधिक प्रबळ ठरत असल्याचे अनेक पुरावे समोर येत आहेत. ज्यात महिलांचा पर्याने देशाचा विकास अडकलेला आहे.

Late N.P.W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref No.
Dt.
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani Distt. Bhandara

Volume-2 (2021)
Issue-1 (January-2021)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed/Refereed Multi-Disciplinary E-Journal

महिलांच्या विकासाचे प्रश्न व समस्या आणि विविध कायदे

**१) स्त्री पुरूष असमानता** : भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ४८.४६ टक्के लोकसंख्या स्त्रियांची असूनही महिलांना शतकानुशतके दुय्यम वागणूक दिली जात आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात स्त्री पुरूष असमानता निर्माण झाली. लिंग गुणोत्तर, स्त्रीअर्भक मृत्युदर, साक्षरता, आरोग्य, राहणीमानाचा स्तर, पोषणद्रव्यांची उपलब्धता, वेतनातील तफावत, जमीन व मालमत्तेची मालकी इत्यादी बाबतीत आजही मोठ्या प्रमाणात स्त्री पुरूष असमानता दिसते.

**२) महिलांविरूद्ध हिंसाचार** : कुटुंब आणि समाजात महिलांना दुय्यम स्थान दिले गेल्यामुळे त्यांच्यावर कौटुंबिक छळ अत्याचार, सामुदायिक हिंसाचार व हिंसाचाराची प्रवृत्ती अजूनही मोठ्या प्रमाणात दिसून येते. महिलांवरील हिंसाचार कमी करण्यासाठी कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ अंमलात आणला असून महिला सबलीकरण योजना व कायदे तयार करण्यात आले आहेत.

**३) स्त्रीभृणहत्या** : वंशाला दिवा म्हणून मुलगाच पाहिजे या विकृत मानसिकतेतून स्त्री भृणहत्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. दर हजारी ० ते १ वर्षपर्यंत मृत्यु पावणाऱ्या मुलींचे प्रमाण म्हणजे स्त्रीभृणहत्या किंवा स्त्री अर्भक मृत्युदर होय. हा दर वाढण्यामागे सामाजिक, आर्थिक कारणे, रूढी, परंपरा, कुटुंबप्रमुखाचा दर्जा, दारिद्र्य, निरक्षरता, अज्ञान, मोक्षप्राप्तीची संकल्पना तसेच कायद्याचे भय नसणे वा ठळक कारणांमुळे स्त्रीभृणहत्या किंवा बालिका हत्या मोठ्या प्रमाणात केल्या जातात. पण संकुचित मानसिकता व सामाजिक परंपराचा पगडा हे यामागील प्रमुख कारण होय. गर्भलिंग प्रतिबंधक कायदा १९९४ अंमलात आणला गेला असला तरी ही कृत्ये सुरूच आहेत.

**४) महिला सबलीकरण** : महिलांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी महिला सबलीकरण धोरण अंमलात आणले गेले. राज्यघटना कायदे, कल्याणकारी योजना तसेच उपक्रम इत्यादी माध्यमातून सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय असमानता दूर करण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. २००१–२०११ हे स्त्री सक्षमीकरण दशक घोषित करण्यात आले असून त्यांअतर्गत राष्ट्रीय महिला सबलीकरण अभियान, मिशन पूर्ण शक्ती अभियानाची प्रमुख होते. घोषवाक्य इत्यादीची माहिती अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

स्त्रियांना प्रजननासंबंधीचे हक्क असावे, मुल जन्माला घालण्याचे स्वातंत्र्य असावे, हे महिला सबलीकरण व समानतेचे मूलभूत तत्त्व आहे. महिला सबलीकरण व समानतेचे मूलभूत तत्त्व आहे. महिला सक्षमीकरणासाठी त्यांचे शिक्षण, आरोग्य व अर्थार्जनाची क्षमता इत्यादी बाबी महत्त्वाचा आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या विकास कार्यक्रमात महिला सक्षमीकरणावर विशेष भर दिला आहे. युएनडीपी सहस्त्रक विकास उद्दिष्टे आणि शाश्वत विकास साध्य करण्याचा मार्ग म्हणून महिला सबलीकरणाला महत्त्व दिले गेले आहे.

**५) महिलांची असुरक्षितता** : २१ व्या शतकातही महिलांची असुरक्षितता हा गंभीर मुद्या बनला आहे. बालिकांची लैंगिक असुरक्षितता व हत्या हा विकासावर कलंक ठरणारा मुद्या आहे. महिलांवरील लैंगिक अत्याचार, शोषण, लैंगिक भेदभाव, वाढते बलात्कार इत्यादींमुळे देशाची प्रतिमा मलीन झाली असून महिला भयाच्या सावटाखाली वावरताना दिसून येत आहेत. विकृत मानसिकता, शिक्षेच्या कठोर तरतुदीची अंमलबजावणी न होणे तसेच मतांचे राजकारण इत्यांदीमुळे महिला असुरक्षिततेच्या समस्येला खतपाणी मिळत आहे. याचा एकूण परिणाम म्हणजे स्त्रीविकासात मोठे अडथळे निर्माण होत आहेत.

वरील ठळक समस्यांवर गांभीर्याने विचार व अभ्यास करून त्या सोडविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणेगरजेचे आहे. महिलांना बरोबरीचा मानवं घटक समजून वागणूक दिल्यास महिला सबलीकरणाचे वेगळे धोरण राबविण्याची गरज राहणार नाही.

Off. Principal
Late N.P.W. College
Lakhani, Dist. Bhandara

**महिलांसाठी कल्याण योजना** : शासकीय स्तरावर महिलांसाठी अनेक कल्याणाच्या योजना राबविण्यात येतात.

**नोकरदार महिलांसाठी योजना** : नोकरदार महिलांना राहण्यासाठी वसतिगृह सोयी, महिलांसाठी प्रशिक्षण व रोजगार कार्यक्रमास मदत, स्वाधार गृह, स्वच्छता व प्रसाधनगृह व्यवस्था.

**संकटग्रस्त महिलांसाठी योजना** : मातृत्व लाभ कार्यक्रम, आरोग्यविषयक व रोजगारविषय सोयी व योजनेद्वारे संकटग्रस्त महिलांना पुरविल्या जातात.

**किशोरवयीन मुलींसाठी योजना** : राजीव गांधी योजना १ ते १२ वी पर्यंत मोफत पास सवलत योजना, शैक्षणिक सोयी, सायकल वाटप इत्यादी.

**मानवी व्यापार प्रतिबंध** : मानवी व्यापार प्रतिबंधात्मक अनेक योजना राबविण्यात आल्या जातात. महिलांसाठी उज्वल योजना राबविली आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी** : राष्ट्रीय मिशन, सबलीकरण वर्ष व दशक घोषित करण्यात आले, महिला (राष्ट्रीय) आयोगाचा स्थापना व अधिनियम, बेटी बचाओ—बेटी पढाओ वुमेन्स हेल्पलाईन स्कीम इ.

**महिला सन्मानासाठी पुरस्कार** : महिला सन्मानासाठी अनेक पुरस्कार राणी मैडिल्यू, जलीयांग, देवी अहिल्याबाई, माता जिजाबाई आणि राणी रूद्रम्मा पुरस्कार इत्यादी देण्यात येतात.

**राष्ट्रीय महिला आयोग** : महिलांना त्यांचे मानवी हक्क व अधिकार मिळून शाश्वत सक्षमीकरण साधले जावे म्हणून १९९० साली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. यात आयोगाचे स्वरूप रचना, आयोगाच्या अध्यक्षा त्यांचे अधिकार, दृष्टिकोन, कार्ये, जबाबदाऱ्या, विशेष हक्क, डावपेच इत्यादी अभ्यासणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात विजया राहाटकर यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग कार्य करीत आहे. महिलांसोबत दिवसेंदिवस वाढत जाणारे गैरव्यवहार व असभ्यपणा लक्षात घेता राष्ट्रीय महिला धोरण २०१६ साली मजुदा तयार करण्यात आले.

स्त्री हा जिवंत हाडामासांचा बनलेला पुरूषांप्रमाणेच एक मानव घटक आहे. ही जागरूकता समाजातील प्रत्येक घटकांत, समाजात वर्गात आल्यास महिला विकासाची उद्दिष्टे साध्य करणे शक्य आहे. महिलांसाठी अनेक कायदे व अधिकार क्षेत्र तयार करून निश्चित करण्यात आली आहेत. पण ते वापरण्याचे हक्क व स्वातंत्र्य महिलांना मिळणे व त्यांनी ते मिळवून घेणे अत्यंत गरजेचे आहे. ज्या दिवशी हे शक्य होईल त्या दिवसापासून भारत विकसित देशांच्या यादीत असेल याबाबत शंका नाही.

## निष्कर्ष

१. भारतात अजूनही महिला हा दुय्यम घटक मानला जातो.
२. काही निवडक स्त्रिया विकासाच्या उच्च टप्प्यावर आहेत.
३. जननी असूनही महिलांना प्रजननासंबंधी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नाही.
४. महिला हक्क आणि कायद्यांची पारदर्शक अंमलबजावणी होत नाही.
५. वाढती विषमता व असुरक्षा ही विकास मार्गातील मोठी अडचण होय.

## उपाययोजना

१. स्त्रियांना मानव घटक समजून वागणूक दिली जावी.
२. महिलांना आपले हक्क आणि अधिकार याबाबत माहिती करून घ्यावी.

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

३. सामाजिक नियमांची अनावश्यक चौकट व जुनाट परंपरा तसेच रूढींची बंधने काढून टाकली जावीत.

४. स्त्रीसुरक्षेविषयी कायदे कठोरपणे राबविले जावेत.

५. महिला केंद्रित शाश्वत स्त्रीसमक्षमीकरणाचे नियोजन स्वतंत्र आराखड्याच्या स्वरूपात केले जाते.

६. स्त्रियांनी संघटितपणे आपल्या हक्कासाठी आवाज उठवावा.

७. महिलांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी ग्रामिण व दुर्गम क्षेत्रापासून सुरूवात केली जावी.

८. स्त्रीभ्रूणहत्या, कौटुंबिक हिंसाचार, बलात्कार, लैंगिक शोषण, यासारख्या कुप्रथांना हद्दपार केले जावे.

९. ५० टक्के महिला आरक्षणाचा मुद्या प्रत्येक क्षेत्रात अंमलात आणला जावा.

१०. स्त्री--पुरूष समानता प्रस्थापित करण्यासाठी स्त्रियांना समान संधी दिली जावी.

मानवी हक्क आणि महिला विकासाची संबंधीचे अनेक कायदे करण्यात आले असून त्यांची माहिती व अंमलबजावणी प्रभावीपणे झाल्यास महिला विकास व देशविकास एकाच दिशेने व एकाच वाटेवरून करता येईल. अनैतिक मानव व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ यात १९६८ साली सुधारणा करण्यात आली. हुंडा प्रतिबंध कायदा २००५, महिला असध्य प्रदर्शन प्रतिबंध कायदा १९६८, गर्भधारणापूर्व आणि जन्मपूर्व निदान तंत्र (लिंग निवड) प्रतिबंध कायदा १९९४, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५, कार्यस्थळी, महिलांचा लैंगिक छळ (थोपवणूक प्रतिबंधक निवारण) कायदा २०१३ इत्यादीचे पालन करण्यात आल्यास गुन्हे, अन्याय, अत्याचार यावर आपोआप प्रतिबंध लागेल.

'नारी नही चिंगारी तू, अबला नही सबला तू,
बदल देगी छबी देशकी, विकासकी ऐसी गंगा तू'

## संदर्भ सूची

१. डॉ. दीपक पवार, 'महिलांचे राजकीय सक्षमीकरण', श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. रा. ज. लोटे, 'भारतीय शासन आणि राजकारण', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
३. डॉ. अलका देशमुख, 'विविधांगी आयामातून स्त्री', श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर
४. लोकशाही वार्ता, 'उंबरठा', दि. २ फेब्रुवारी २०२१ पृष्ठ क्र १,२
५. डॉ. शीला द. देशपांडे, 'कुटुंबसंस्था आणि परित्यक्ता स्त्री', श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
६. डॉ. स्मीता मेहेत्रे, 'भारतीय स्त्री आणि मानवाधिकार', श्री.साईनाथ प्रकाशन नागपूर.
७. M.lokmat.com– सोलापूर १० डिसेंबर २०१९.

Late N. P. W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref No. Dt.
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara



Scanned with CamScanner